**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक- ७९/२०२३**
**महा. शासन वि. निवृत्ती कृष्णा पाटील**
**निशाणी क्रमांक- २८/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - ४ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

माझे नाव - शेखर विश्वनाथ पाटील
वय - ३६ वर्षे
व्यवसाय - नोकरी
पत्ता - कसबा तारळे, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

१. जखमी विद्या ही माझी आई आहे. दि. १९/०३/२०२३ रोजी रात्री ९ वाजण्याचे सुमारास दुचाकी वाहनाने माझे आईला धडक दिली होती. माझी आई व दोन्ही आरोपी रस्त्याचे बाजूला पडलेले होते. सदरील वेळी मी घरी होतो. स्वप्निलने आवाज दिल्याने मी, माझा भाऊ विनोद आणि माझा मित्र संदीप असे घराबाहेर घटनास्थळी पाच ते दहा मिनिटांत पोहोचलो. सदरील वेळी आम्ही पाहिले की, आई, दोन्ही आरोपी रस्त्यावर पडलेले होते. मी व माझ्या भावाने दोन्ही आरोपींना पकडले. माझी आई वेदनेने आरडाओरडा करत होती. आम्ही आईकडे गेलो असता दोन्ही आरोपी पळून गेले.

२. मी माझे आईला डॉ. सचिन पाटील यांचे दवाखान्यात घेऊन गेलो. परंतु ते उपलब्ध नसलेने आईला डॉ. किरण दोशी, शाहुपुरी, कोल्हापूर यांचे दवाखान्यात घेऊन गेलो. तिथे माझ्या आईवर उपचार सुरू केले. तीन दिवसांनी आईचे मांडीचे ऑपरेशन

केले. त्यानंतर आठवड्याभरानंतर आईचे मनगटाचे ऑपरेशन केले.

३. घटनेवेळी आरोपी निवृत्ती स्प्लेंडर मोटारसाईकल चालवत असल्याचे आरोपी अस्लम याचेकडून कळाले. मोटारसाईकलचा क्रमांक मी पाहिला असता तो एम. एच. ०९ एफ.जी. ३७७६ असा होता. पोलीसांनी तपासादरम्यान माझा जबाब नोंदविला आहे. मी दोन्ही आरोपींना घटनास्थळी पाहिले होते. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. साक्षीदार सांगतो की, आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपींचे विधीज्ञ वकील श्री. व्ही. बी. पाटील यांचेमार्फत उलटतपास सुरू-</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, दुर्गमानवाडच्या यात्रेस दोन ते तीन लाख भाविक येतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दुर्गमानवाड ते तारळे या रस्त्यावर गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, रात्रीची वेळ असल्यामुळे सदरील वेळी अंधार होता. मी पोलीसांना स्वप्निल आवाज दिल्यामुळे घराबाहेर गेलो हे सांगितले होते. तसे माझे जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगत येणार नाही. मी पोलीसांसोबत आम्ही आरोपींना पकडले हे सांगितले होते. तसा मजकूर जबाबत का नमुद नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

५. घटनास्थळ ते आमचे घर हे अंतर ४० ते ५० फुट इतके आहे. मी पोलीसांना जबाब देतेवेळी आईला आधी डॉ. सचिन पाटील यांचे दवाखान्यात घेऊन गेलो व ते उपलब्ध नसलेने डॉ. दोशी यांचे दवाखान्यात घेऊन गेलो, हे सांगितले नव्हते. मी तथाकथित अपघात पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ अस्लम हे पूर्वीपासून माझे ओळखीचे आहेत.

६. मी घटनास्थळी १० ते १५ मिनिटे होतो. घटनास्थळ ते दुर्गमानवाड फाटा हे अंतर ३०० ते ४०० मीटर इतके आहे. आरोपी हे घटनास्थळी ५ ते १० मिनिटे होते. मी पोलीसांना जबाब देतेवेळी दोन्ही आरोपी तिथून पळून गेले असे सांगितले नव्हते. घटनास्थळावरून निघाले नंतर डॉ. दोशी यांचे दवाखान्यात पोहोचण्यात आम्हाला अंदाजे एक तास लागला. आईला दवाखान्याते नेतेवेळी गाडीमध्ये मी, आई, माझा भाऊ आणि मित्र अमोल जोशी असे होतो. हे म्हणणे खरे आहे की, गाडीमध्ये अजून कोणी नव्हते. मी पोलीसांना जबाब देतेवेळी गाडीत मित्र अमोल असल्याचे सांगितले नव्हते.

७. हे म्हणणे खरे नाही की, घटनेपूर्वीपासून आईचे पायाचे उपचार चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दुसऱ्या रात्री आम्ही आरोपींकडे रक्कम रू. १,७५,०००/- ची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी तशी रक्कम दिली नाही म्हणून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आईला मदत करण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

Sd/-

दिनांक : ०८/०१/२०२६

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

राधानगरी